औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची बुधवार दि. ३०.१.९१ रोजी दुपारी ३.०० वाजता झालेल्या ५८ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. श्री. ईश्वर भोसीकर | सभापती औरंगाबाद मंडळ |
| २. श्री. अरविंद महाजन | उपसभापती औरंगाबाद मंडळ |
| ३. श्री. गिरीश गोखले<br>विभागीय आयुक्त,<br>नासिक. | सदस्य |
| ४. श्री. द. मो. गोडघाटे,<br>उपसंचालक, नगररचना व<br>मुल्यनिर्धारण विभाग,<br>औरंगाबाद. | सदस्य |

विभागीय आयुक्त, औरंगाबाद, आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद व प्रशासक म. न. पा. नासिक हे पूर्वसुचनेनुसार बैठकीस अनुपस्थीत होते.

विषय क्र. १: दिनांक २९.१२.९० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

श्री. द. मो. गोडघाटे ह्यांनी सुचित केले की, एकनाथनगर या वसाहतीतील योजना राबवितांना मंडळाने नियमाप्रमाणे मोकळ्या सोडलेल्या जागेपैकी १० टक्के पावेतो जागा ग्रंथालय इत्यादीसाठी देता येते. मंडळाने अद्याप खुल्या जागा औरंगाबाद महानगरपालिकेस हस्तांतर केलेल्या नसल्याने महात्मा फुले ग्रंथालयाने मागणी केल्याप्रमाणे जागा सदर संस्थेस देणेबाबत मंडळाने तत्वत: मान्यता दिली. असा ठराव करणेत यावा.

त्यावर मा. आयुक्त, नासिक, सभापती ह्यांनी चर्चेत भाग घेऊन सर्वानुमते सदर सुधारीत ठरावास मान्यता देणेत आली.

ठराव क्र. ३४२

दिनांक २९.१२.९० रोजी झालेल्या ५७ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतवर सविस्तर चर्चा होऊन कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: औरंगाबाद महानगरपालिका व भुसावळ न.पा. यांचेकडून आलेल्या झोपडपट्टी कामांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

---

१] उपसभापती हयांनी सभेत माहिती दिली की, औरंगाबाद महानगरपालिकेने सावातनगर या झोपडपट्टी सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यतेसाठी अंदाजपत्रके रु. १,९०,७५०/- चा मंडळाकडे प्रस्ताव पाठविला आहे.

औरंगाबाद जिल्हयासाठी १९९०-९१ वर्षात झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमासाठी सुधारीत तरतुद रु. ७.०१ लक्ष रुपयाची आहे. आतापर्यन्त म.न.पा. चा कामावरील खर्च रु. ४.०१ लक्ष झाला असून शिल्लक तरतुद रु. ३.०० लक्ष आहे. औरंगाबाद महानगरपालिकेच्या हाती सध्या रु. ७.३७ लक्षाची कामे आहेत. त्यामुळे चालु आर्थिक वर्षातील संपूर्ण तरतुद खर्च होऊ शकेल. परंतु पुढील आर्थिक वर्षात म.न.पा. च्या हाती कामे असण्याचे दृष्टीने सदर प्रस्तावास औरंगाबाद महानगरपालिकेने हाती असलेल्या ७.३७ लक्ष रुपयांच्या कामांना प्राधान्य देऊन तरतुदीच्या उपलब्धतेनुसार प्रतिपूर्तीच्या अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यांत यावी.

२] भुसावळ न.प.ने काजी प्लॉटस या झोपडपट्टीतील सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यता मिळावी म्हणून सुधारणा कामांची अंदाजपत्रके रु. १,७२,०३४ पाठविली आहेत.

जळगांव जिल्हयासाठी १०.९२ लक्ष रुपयांची तरतुद असून त्यापैकी भुसावळ शहरासाठी १.४० लक्ष तरतुद प्रस्तावित आहे. त्यापैकी आतापर्यन्त एकुण ०.३८ लक्ष रुपयाचा खर्च करण्यांत आला आहे व १.०२ लक्ष रु. शिल्लक आहे. म.पा. च्या हाती सध्या ४.३३ लक्ष रुपयाची कामे शिल्लक आहेत. परंतु नविन वर्षात न.पा. चे हाती जास्त कामे असण्याची दृष्टीने न.पा. ने त्यांना पूर्वी दिलेल्या प्रशासकीय मान्यता प्राप्त योजनांना प्राधान्य देऊन तरतुदीच्या उपलब्धतेनुसार प्रतिपूर्तीच्या अटीवर ही प्रशासकीय मान्यता देण्यांत यावी अशी माहिती उपसभापती हयांनी मंडळास दिली.

ठराव क्र. ३४३

---

चर्चेअंती औरंगाबाद व भुसावळ येथील वरील कामांना मंडळाने वरीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता दिली.

विषय क्र. ३:

टेलेक्स व झेरॉक्स मशीन चालविण्यासाठी ऑपरेटरची नेमणूक करणेबाबत.

ठराव क्र. ३४४

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, टेलेक्स मशीन चालविण्यासाठी आकृतीबंधात मंजूर असलेले पद भरण्यासाठी प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवून मंजूरी घ्यावी व प्राधिकरणाची मंजूरी येईपर्यन्त टेलेक्स व झेरॉक्स मशीन चालविण्यासाठी एकत्रीत वेतनावर कंत्राटीपध्दतीने रु. ५०० वर अंशकालीन आपरेटरची नेमणूक करण्यांत यावी.

विषय क्र. ४

भुसावळ जि. जळगांव येथील ८१ मध्यम उत्पन्न गट-१, या गाळयांच्या बांधकामासाठी आलेल्या निविदांना मंजूरी देणेबाबत.

ठराव क्र. ३४५

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला मे. बी. वाय. शाहा आणि कंपनी जळगांव यांनी वाटाघाटीद्वारे कमी केलेल्या दराची निविदा [म्हणजेच एस्टीमेट दरापेक्षा १४.५% जास्तीची व चालु शेडूल रेट पेक्षा ३.४०% जास्त दराची] मान्य करण्यांत आली.

विषय क्र. ५: औरंगाबाद येथे गृहनिर्माण भवनाजवळ २४ गाळे उच्च उत्पन्न गट योजनेच्या बांधकामासाठी आलेल्या निविदांना मंजूरी देणेबाबत.

ठराव क्र. ३४६

हा विषय ५८ व्या सभेच्या विषय पत्रिकेवरुन रद्द करण्याचा मंडळाने निर्णय घेतला.

विषय क्र. ६: अमृतधाम नासिक येथील स.क्र. २६७ भाग येथील अल्प उत्पन्न गटातील २०८ गाळयांची योजना

१०० गाळे व १०८ गाळे अशा दोन विभागात कार्यान्वीत करण्याबाबत.

ठराव क्र. ३४७

मंडळाने चर्चेअंती असा निर्णय घेतला की, अमृतधाम नासिक येथील स.क्र. २६७ [भाग] येथील अल्प उत्पन्न गटातील २०८ गाळयांची योजना १००+१०८ गाळे अशा दोन विभागात कार्यान्वीत करण्यास मंडळाने मान्यता दिली.

विषय क्र. ७: मा. सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

[१] औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या नविन औरंगाबाद सिडको एन-५, १५२ मध्यम उत्पन्न गट [सहयाद्री कॉलनी] कॉलनीतील गाळा क्र. ७०४ च्या वाटपाबाबत.

ठराव क्र. ३४८

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने, सदर गाळा शासन आदेशा प्रमाणे श्री. माधवराव गुरुजी हयांना वाटप करता यावा म्हणून उपलब्ध करुन दिला.

बैठकीनंतर मा. सभापतीचे आभार मानून सभा संपली.

. . .